पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 02/12/2019 (सोमवार)
(दुपार)

---

## विनयभंग

पो.स्टे. रामटेक :– दि. 01/12/2019 चे 11:30 वा. ते 13:30 वा. सुमारास 16 वर्षीय पीडित/फिर्यादी हिला 17 वर्षीय विधीसंघर्ष बालकाने भेटायचा आहे असे म्हणुन मोबाईल वर अश्लिल मॅसेज करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 506 भादंवि. कलम 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते या करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर जोगिठाणापेठ, उमरेड येथे दिनांक 26/09/2019 चे 00:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. पुनम अमित लांजेवार, वय 30 वर्ष, रा. जोगिठाणापेठ उमरेड, ह. मु. नेरपिंगळाई, तह. मोर्शी, जि. अमरावती व आरोपी नामे– 1) पति– अमित भाऊराव लांजेवार हे दोघेही पतीपत्नी आहेत. आरोपी नामे– 1) याचे आरोपी क्र. 2) हिच्या सोबत प्रेमसबंध असल्याने फिर्यादीने आरोपी क्र. 1) याला टोकले या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन घरातुन हाकलुन दिले. तसेच आरोपी क्र. 1, 2), 3) प्रशांत भाऊराव लांजेवार, 4) वर्षा निलेशराव दसमवार चौघे, रा. जोगिठाणापेठ, उमरेड व 5) संजय दामोधर वानखेडे रा. वैभव नगर, दत्तवाडी नागपूर यांनी फिर्यादीला "तुझ्या वडिलांनी लग्नात मागणी प्रमाणे हुंडा दिला नाही, तु भिकारचोटाची औलाद आहे. तु आमच्या घरात अवदसा आणली" असे म्हणुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून व महिला समउपदेशन केंद्र मोर्शी यांचे लेखी पत्रावरून पोस्टे शिरखेड जि. अमरावती अप क्र. 277/19 गुन्हा नोंद आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 504, 506, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार तारूदत्ता बोरसरे 9764118811 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर